|| श्री ||

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ | वर्ष ७ वे | अंक ६६ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

## सुट्टीची सुचना

स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी वीरभूमी कार्यालयास सुटी असल्याने दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहीरातदार, प्रतिनिधी, हितचिंतक, एजंट यांनी नोंद घ्यावी. – संपादक

# विकसित भारतासाठी एकजुटीने काम करा

## फाळणी विभीषिका स्मृती दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन



**नवी दिल्ली | वीरभूमी–** १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फाळणी विभीषिका स्मृती दिनानिमित्त सोशल मीडियावर पोस्ट करत फाळणीच्या कटू आठवणींना उजाळा दिला. हा दिवस राष्ट्रातील सलोखा आणि बंधुभाव जपण्याचा संकल्प अधिक दृढ करणारा ठरावा तसेच 'विकसित भारत' घडवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज आपण फाळणीच्या भीषणतेचा स्मरण दिन पाळत आहोत. फाळणीचा फटका बसलेल्या सर्वांच्या धैर्याचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे. इतिहासातील या घटनेने अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. कुटुंबे विस्थापित झाली, आप्तेष्ट हिरावले गेले आणि असंख्य लोकांना असीम वेदना सहन कराव्या लागल्या.

मात्र, या संकटावर मात करत अनेकांनी शून्यातून आपले आयुष्य पुन्हा उभे केले. संकटांचे यशात रूपांतर करत त्यांनी देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले, असेही मोदी यांनी नमूद केले.

भारत दरवर्षी १४ ऑगस्ट रोजी विभाजन विभीषिका स्मृती दिन पाळतो. १९४७ मधील फाळणीदरम्यान प्राण गमावलेल्या आणि अकल्पनीय यातना सहन केलेल्या सर्वांना या दिवशी देश आदरांजली वाहतो. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याच वेळी देशाच्या मोठ्या भागाला फाळणीच्या वेदना सहन कराव्या लागल्या. फाळणीनंतर पंजाब आणि बंगालच्या विभागलेल्या भागांतून लाखो लोकांनी आपले सर्वस्व मागे सोडून स्वतंत्र भारतात आश्रय घेतला.

### 'विकसित भारत'ासाठी एकजुटीचे आवाहन

फाळणीच्या कटू आठवणींपासून प्रेरणा घेत राष्ट्रातील सलोखा आणि बंधुभाव जपण्याचा संकल्प अधिक दृढ करूया. 'विकसित भारत' घडवण्याच्या दिशेने सर्वांनी मिळून कार्य करावे, हीच सदिच्छा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

# अकोलेत पाण्याच्या टाकीत पडून बिबट्याचा मृत्यू

**अकोले | वीरभूमी–** अकोले शहरातील अभिनव शिक्षण संस्थेजवळ बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या पाण्याच्या टाकीत पडून अंदाजे दीड वर्षांच्या नर बिबट्याचा विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाला. रात्री भक्ष्याच्या शोधात असताना ही घटना घडल्याची माहिती वन विभागाने दिली.

अकोलेचे वनपरीक्षेत्र अधिकारी ए. सी. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, बिबट्या बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या पाण्याच्या टाकीत पडला. टाकीत पाणी वर नेण्यासाठी विद्युत मोटार बसविण्यात आली होती. टाकीत पडल्यानंतर घाबरलेल्या बिबट्याने मोटारीच्या वायरला दात लावल्याने त्याला विजेचा धक्का बसला आणि त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृत बिबट्याला सुगाव येथे आणले. सुगाव येथील रोपवाटिकेत अकोलेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शेळके यांनी बिबट्याचे शवविच्छेदन केले.

शवविच्छेदनानंतर वन विभागाच्या नियमानुसार सुगाव रोपवाटिका येथेच बिबट्याचे दहन करण्यात आल्याची माहिती वनपरीक्षेत्र अधिकारी ए. सी. पाटील यांनी दिली.

## SPOT NEWS

### राहुल गांधीविरोधातील सावरकरांशी संबंधीत प्रकरण रद्द

**नवी दिल्ली –** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात स्वातंर्त्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित मानहानी प्रकरणी कनिष्ठ न्यायालयात दाखल असलेले प्रकरण रद्द करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी यासंदर्भातील निकाल दिला. हे प्रकरण उत्तर प्रदेशातील आहे. सर्वोच्च न्यायालयानेराहुल गांधी यांच्या विरोधात देण्यात आलेली तक्रार आणि न्यायाधीशांनी हजर राहण्याचे दिलेले आदेश रद्द केले आहेत. जेव्हा प्रकरणात कलम नोंदवणे गरजेचे असते आणि त्याची नोंद नसते, तेव्हा ते प्रकरण आपोआपच रद्द होते, असे न्यायालय म्हणाले. न्यायालय म्हणाले की, उत्तर प्रदेश सरकारकडून दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात कलमांचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे गुन्हा आणि न्यायाधीशांनी काढलेला आदेश रद्द करत आहोत. हे प्रकरण २०२२ मधील आहे. भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात झालेल्या कार्यक्रमात वीर सावरकर यांच्याबद्दल एक विधान केले होते. राहुल गांधी यांनी सावरकर हे इंग्रजांचे नोकर होते असा उल्लेख केला होता आणि सावरकर इंग्रजांकडून पेन्शन घेत होते, असे विधान केले होते. यावर आक्षेप घेत वकील नृपेंद्र पांडे यांनी कनिष्ठ न्यायालयात तक्रार दिली होती. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आहे.

### भारतीय रेल्वेने सलग चौथ्यांदा कमावला विक्रमी नफा

**नवी दिल्ली –** भारतीय रेल्वे गेल्या काही वर्षांपासून विविध स्तरांवर मोठ्या प्रमाणात काम करत आहे. प्रवासी वाहतूक, माल वाहतूक आणि पायाभूत सुविधांचा विस्तार यावर भर दिला जात आहे. तसेच उत्पन्न वाढीच्या दृष्टीने भारतीय रेल्वे विविध पर्यायांचा विचार करत आहे. याचा परिणाम म्हणजे सलग चौथ्यांदा भारतीय रेल्वेने प्रवासी वाहतूक, माल वाहतूक यामध्ये नफा कमावला आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत संसदेत आकडेवारी सादर केली. अश्विनी वैष्णव यांनी संसदेतील एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना म्हटले आहे की, आर्थिक वर्ष २०२५-२६ ची आकडेवारी तात्पुरती असून अंतिम आकडेवारीत बदल होऊ शकतो. या आकडेवारीत २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षांचा कोरोना प्रभावित वर्षे म्हणून समावेश आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारतीय रेल्वेचा एकूण महसूल ३.२ टक्क्यांनी वाढून २,७३,४४४ कोटी झाला. मागील वर्षी २०२४-२५ मध्ये, रेल्वेचा एकूण महसूल २,६५,००४ कोटी होता. याच कालावधीत मालवाहतुकीतून मिळणारे उत्पन्न वाढून १,७३,४५० कोटी झाले, तर मालवाहतुकीचे प्रमाण १,६७० दशलक्ष टन पर्यंत पोहोचले.

## चाकण एमआयडीसीतील समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पुणे | वीरभूमी–** चाकण एमआयडीसीतील रस्ते, वाहतूक कोंडी आणि इतर पायाभूत सुविधा संबंधी अडचणी प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली व उद्योजकांना आश्वस्त केले आहे. यासाठी चाकण येथील उद्योजक, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक व जिल्हा प्रशासनासोबत लवकरच बैठक घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज चाकण नागरी कृती समिती व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी धनंजय शेडबाळे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. यावेळी उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडविण्याबाबत त्यांना आश्वस्त केले.

या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपमुख्यमंत्र्यांनी एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी,पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी,पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, खेडचे प्रांत अधिकारी अनिल दौंडे आणि चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी अंकुश जाधव यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

# सरकारला २८ ऑगस्टचा अल्टिमेटम

**जालना | वीरभूमी–** मराठा आरक्षणाच्या नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या मुद्यावरून राज्य सरकारला आणि बावनकुळेंना मनोज जरांगे यांनी इशारा दिला असून तुम्ही केलेली चूक २८ ऑगस्टच्या आत पत्र देऊन दुरुस्त करा. जी प्रमाणपत्रे रद्द केली आहेत, ती पुन्हा वैध करा आणि समाजाला द्या, आमचे काहीही म्हणणे असणार नाही. मात्र, जर ही चूक सुधारली नाही, तर पुन्हा मी तुम्हाला सोडणार नाही असा सक्त इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच माध्यमांशी बोलताना आपली कौटुंबिक पार्श्वभूमी सांगत अत्यंत भावुक प्रतिक्रिया दिली होती. बावनकुळेंच्या या भावुक व्हीडीओवर



आता मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आपली सविस्तर प्रतिक्रिया दिली असून पत्रकारांशी संवाद साधताना मनोज जरांगे म्हणाले, मला पत्रकारांनी सांगितले की चंद्रशेखर बावनकुळे माध्यमांसमोर बोलताना भावुक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. रात्री मी त्यांचा तो व्हिडीओ पाहिला. त्यांनी त्यात त्यांच्या आईचा उल्लेख केला. तसेच, आपण मराठ्यांच्या विरोधात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मी माझ्या मराठा समाजावर खूप प्रेम करतो. मराठा समाजाच्या विरोधात जर कुणी मराठा आला तरी मी त्याला सोडत नाही, मग दुसरा कुणी आला तर त्याला सोडण्याचा प्रश्नच येत नाही. पण तुम्ही व्हीडीओत आईचे नाव घेतले आणि तुम्ही व्यथित झालात, हे पाहून मलाही वाईट वाटले. आम्ही मराठे आहोत, आम्ही एकदा-दोनदा माफ करून सोडून देतो. त्यामुळे मी तुम्हाला यावेळी माफ करतो आणि इथून पुढे तुमच्यावर कोणतेही व्यंग करणार नाही.

### परळीच्या टोळीच्या नादी लागल्याने रडण्याची वेळ

बावनकुळेंना माफ करत असतानाच जरांगे पाटलांनी त्यांच्यावर राजकीय निशाणाही साधला. ते म्हणाले, तुम्ही इतके रडकुंडीला आलात, कारण तुम्ही मराठ्यांच्या नादी लागलात. मला तुमच्याबद्दल इतके बोलण्याची गरज नव्हती, पण तुम्ही मोठी चूक केलीत. परळीच्या टोळीच्या नादी लागून आणि त्यांचे ऐकून तुम्ही मराठ्यांच्या लेकरांचे वाटोळे केले, म्हणूनच तुमच्यावर आज ही रडकुंडीची वेळ आली आहे. त्यामुळे इथून पुढे तरी तुम्ही त्यांचे ऐकणे बंद करा.

# राज्यातील ५ पोलीस अधिकाऱ्यांची राष्ट्रपती पदकासाठी निवड

**मुंबई | वीरभूमी–** पोलीस, कारागृह आणि नागरी संरक्षण दलात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या मानाच्या राष्ट्रपती पदकांसाठी महाराष्ट्रातील ५ अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून याबाबतची घोषणा करण्यात आली.

केंद्रीय गृह मंत्रालयाने १४ ऑगस्ट रोजी देशभरातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाहीर झालेली शौर्य, उत्कृष्ट सेवा आणि गुणवत्तापूर्ण सेवा पदके घोषित केली. यामध्ये मानाच्या राष्ट्रपती उत्कृष्ट सेवा पदकासाठी पोलीस श्रेणीतून महाराष्ट्राचे अपर पोलीस महासंचालक शिरीष रवींद्र जैन, उपपोलीस अधीक्षक सुभाष नानासाहेब भुजबळ आणि साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय राजाराम वायचळे यांची निवड झाली आहे. तर कारागृह सेवा गटातून सुभेदार संजीव सखाराम घाणेकर आणि हवालदार संजय राजारामजी तळवारे यांना राष्ट्रपती उत्कृष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

याशिवाय, गुणवत्तापूर्ण सेवा पदकांसाठी पोलीस सेवा श्रेणीत महाराष्ट्रातील ३७ अधिकारी व



कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये उपपोलीस महानिरीक्षक संजय बाजीराव जाधव, उपपोलीस महानिरीक्षक विजयकुमार गोपीनाथ मगर, पोलीस अधीक्षक दिगंबर पांडुरंग प्रधान, उपपोलीस अधीक्षक प्रशांत कुलकर्णी, भागीरथ देशमुख, प्रवीण तेजले, मनोजकुमार यादव, तसेच पोलीस निरीक्षक वैभवकुमार जाधव, संतोष बारगे, विश्वजीत कागिंडे, जितेंद्र कदम, विनोद पाटील, प्रदीप चौगावकर यांच्यासह इतर साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक व हेड कॉन्स्टेबल यांचा समावेश आहे.

इतर दलांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचाही या यादीत समावेश आहे. अग्निशमन सेवेतून मुख्य अग्निशमन अधिकारी शंकर उत्तम मिसाळ आणि अग्निशामक शैलेश महादेव जगताप यांची निवड झाली आहे. गृहरक्षक व नागरी संरक्षण क्षेत्रातील योगदानासाठी पोपट रामजी सांगडे, अशोक नामदेव इंगळे व मनोज सदाशिव बारसागडे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच कारागृह सेवेतून अधीक्षक विकास हनुमंत राजनाळवार आणि हवालदार महेश लक्ष्मण गडनाईक यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गावरील कामांना वेग

**मुंबई | वीरभूमी–** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि कोंडीमुक्त करण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील रखडलेल्या कामांना आता वेग देण्यात येणार आहे. केवळ कामांचा आढावा न घेता प्रत्यक्ष कामाला गती देण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मंत्रालयात मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी कोलाड, संगमेश्वर, निवळी आणि लांजा येथील उड्डाणपुलांची कामे ३१ ऑगस्टपूर्वी प्रत्यक्ष दिसतील अशा पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गणेशोत्सव काळात महामार्गावरील वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी प्रलंबित कामांमध्ये कोणताही विलंब होऊ नये, अशी सूचना करण्यात आली. दरम्यान, नागोठणे उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामासाठी आयआयटीची तांत्रिक मदत घेण्यात येत आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंच्या महामार्गाची दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## मराठी सक्तीची; १८ पासून कारवाई

**पुणे | वीरभूमी–** राज्यातील ऑटो-रिक्षा आणि इलेक्ट्रॉनिक मीटर असलेल्या टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी १५ ऑगस्ट ही अंतिम मुदत देण्यात आली होती. ही मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवली जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील प्रस्तावित सुधारणांनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांशी योग्य संवाद साधता यावा, त्यांचे म्हणणे समजून घेता यावे आणि त्यांचा प्रवास सुरक्षित व सोयीस्कर व्हावा, यासाठी चालकांना स्थानिक(मराठी) भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. चालकांना १७ तारखेपर्यंत वेळ देण्यात आला असून १८ तारखेपासून कारवाईला सुरुवात केली जाईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

वाहनांना हाय-सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याच्या निर्णयाबाबतही सरनाईक यांनी महत्त्वाची माहिती दिली. वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट लावण्यासाठी ३१ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर नवीन वर्षात १ जानेवारीपासून नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर थेट कारवाई सुरू केली जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यातील बसस्थानकांवरील अस्वच्छता आणि ठेकेदारांच्या मनमानी कारभारावरून मंत्री प्रताप सरनाईक यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. अस्वच्छतेवरुन मंत्री सरनाईक यांनी ठेकेदारांनी एसटी कर्मचाऱ्यांना आणि प्रवाशांना मूलभूत सुविधा न दिल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

सध्या सोशल मीडियावर विद्यार्थ्यांचे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. यामध्ये विद्यार्थी रस्त्यांवरील खड्ड्यांची अवस्था आणि बसच्या अपुऱ्या फे-यांबद्दल तक्रार करत आहेत. यावर बोलताना सरनाईक यांनी सांगितले की, त्यांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी विशेष हेल्पलाइन आहे.

# तिरंगा रॅलीतून विकसित राष्ट्राचा संकल्प : ना. राधाकृष्ण विखे पाटील

## वंदे मातरम् गायनाचा निर्णय राष्ट्रीय स्वाभिमान वाढविणारा | छत्रपती संभाजीनगरच्या रॅलीत अहिल्यानगरचे कार्यकर्ते सहभागी



**अहिल्यानगर | वीरभूमी–** भारतीय जनता पक्षाच्या वतीने संपूर्ण देशात आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सक्षम, समृद्ध आणि विकसित राष्ट्र घडविण्यासाठी योगदान देण्याचा संकल्प करण्यात आला आहे, असे जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. लाल किल्ल्यावरून 'वंदे मातरम्' गायनाचा निर्णय मातृभूमीचा गौरव आणि राष्ट्रीय स्वाभिमान वाढविणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर तिरंगा' उपक्रमाचे आवाहन केले आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा फडकावून देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन करत मंत्री विखे पाटील म्हणाले की, भाजपच्या वतीने राज्यभर काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीतून भारताला सक्षम, समृद्ध आणि विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

यावर्षी 'वंदे मातरम्' या गीताला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून 'वंदे मातरम्' गीताचे गायन करण्याचा घेतलेला निर्णय प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आणि चैतन्यदायी असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

'वंदे मातरम्' हे गीत केवळ शब्दांची रचना नसून मातृभूमीप्रती असलेले अथांग प्रेम, त्याग आणि समर्पणाची भावना आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारक आणि स्वातंत्र्यसैनिकांना एका सूत्रात बांधणारा प्रेरणामंत्र या गीतात सामावलेला आहे, असे त्यांनी नमूद केले.

केंद्र सरकारने 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर लाल किल्ल्यावरून या गीताचे गायन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर शासकीय व सार्वजनिक कार्यक्रमांची सुरुवात 'वंदे मातरम्' गीताने करण्याचा निर्णयही राष्ट्रप्रेम आणि समृद्ध इतिहासाची प्रेरणा देणारा असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.

# SPOT NEWS

## रंगीत खडूंतून साकारला देशभक्तीचा संदेश

**● पारनेर । वीरभूमी –**



८० व्या भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून पारनेर येथील 'न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स'मध्ये रंगीत खडूंच्या माध्यमातून आकर्षक चित्रमय फलकलेखन साकारण्यात आले. एकात्मता, देशभक्ती आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देणाऱ्या या कलाकृतीने विद्यालयासह परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. फलकावर तिरंगा, राष्ट्रीय प्रतीके, स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्मे व थोर महापुरुषांचे विचार तसेच 'जय हिंद' आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणा साकारण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना रुजविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. विद्यालयाचे कला शिक्षक ज्ञानेश्वर रामदास कवडे यांनी ही कलाकृती साकारली. त्यांच्या कलाकौशल्याचे मुख्याध्यापक, उपप्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कौतुक करून पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या उपक्रमाचे विद्यार्थी व नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे कौतुक केले.

## सेक्रेडहार्ट, आयकॉन, आर्मी स्कूल उपांत्य फेरीत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेतील उपांत्यपूर्व सामन्यांना शुक्रवारी चांगलीच रंगत आली. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या सामन्यांत सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंट, आयकॉन पब्लिक आणि आर्मी पब्लिक स्कूलने दमदार कामगिरी करत पुढील फेरीत प्रवेश केला. १६ वर्षांखालील गटात सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंट स्कूल व ऑर्किड स्कूल यांच्यातील सामना ०–० असा बरोबरीत सुटला. टायब्रेकरमध्ये सेक्रेडहार्टने ४–३ असा विजय मिळवला. १२ वर्षांखालील गटात आयकॉन पब्लिक स्कूलने आर्मी पब्लिक स्कूलवर टायब्रेकरमध्ये ३–२ अशी मात केली. १४ वर्षांखालील गटात आर्मी पब्लिक स्कूलने आयकॉन पब्लिक स्कूलचा ३–० असा दणदणीत पराभव केला. विजयने दोन, तर अनिकेतने एक गोल केला. १६ वर्षांखालील गटात आर्मी पब्लिक स्कूलने आयकॉनवर १–० असा निसटता विजय मिळवला. वीद्र वीरने ३५व्या मिनिटाला निर्णायक गोल केला. नॉकआऊट पद्धतीने सुरू असलेल्या स्पर्धेत विजयी संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला असून, पुढील सामन्यांत अंतिम फेरीसाठी चुरस वाढणार आहे.

## पाथर्डी तालुक्यातील आणखी एका अल्पवयीन मुलीचे अपहरण

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील पुर्व भागातील एका गावातुन १५ वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी रात्रीच्या सुमारास घरातून बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते कुटुंबीयांसह एकत्र राहतात व शेती करतात. दि. १३ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १० वाजता कुटुंबीय जेवण करून झोपले होते. मध्यरात्री सुमारे २ वाजता फिर्यादी यांना जाग आली असता त्यांची अल्पवयीन मुलगी घरात आढळून आली नाही. घरातील सदस्यांनी इतरत्र नातेवाईक व परिसरात शोध घेतला; मात्र तिचा ठावठिकाणा लागला नाही. मुलगी अल्पवयीन असल्याने कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फूस लावून पळवून नेले असावे, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यानुसार राहत्या घरातून मुलीला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची फिर्याद पाथर्डी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली असून, बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## पद्मशाली समाजातील गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सप्टेंबरमध्ये गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

गुरुवर्य पोट्यन्ना बतीन शैक्षणिक सामाजिक मंडळाच्या वतीने पद्मशाली समाजातील गुणवंत पदवीधारक, पदविकाधारक, पदव्युत्तर विद्यार्थी तसेच सेवेत कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात येणार आहे. रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता हा समारंभ होणार आहे. सन २०२६ मध्ये पदवी, पदविका व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच शिक्षक दिनानिमित्त समाजातील शिक्षकांचा यावेळी गौरव केला जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करून नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी शंकरराव नक्का (९८६०८४७१८४), नारायण एक्कलदेवी (९४२३७५०९८४), मारुती अरकल (९८५०२२९९३१) व दत्तात्रय जोग (९२७००२५००३) यांच्याशी संपर्क साधावा. समाजातील गुणवंतांना प्रोत्साहन आणि शिक्षकांच्या योगदानाचा सन्मान हा उपक्रमाचा उद्देश असल्याचे अध्यक्ष नारायण मंगलारम, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम व सचिव श्रीनिवास एल्लाराम यांनी सांगितले.

### धामणगावच्या 'खरूज नायट्याची बारव' शिलालेखातून

# उलगडतो अठराव्या शतकातील जलसंस्कृतीचा इतिहास

**जगदंबा देवीच्या भक्तीतून विसाजीरावांनी उभारली बारव । शके १६८७ मधील शिलालेख ठरतो स्थानिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा**

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील धामणगाव येथे जगदंबा माता मंदिरासमोरील प्राचीन बारव आजही अठराव्या शतकातील जलसंस्कृती, धार्मिक श्रद्धा आणि समाजोपयोगी कार्याची साक्ष देत उभी आहे. स्थानिक पातळीवर 'खरूज नायट्याची बारव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बारवेच्या पायऱ्या उतरताना डाव्या बाजूच्या भिंतीवर एक महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आहे. या शिलालेखातून बारव बांधणाऱ्या व्यक्तीचे नाव, त्यांचे पितृनाम, गावाचे नाव तसेच बांधकामाचा कालखंड यांची माहिती मिळते.

सदर शिलालेख उठाव स्वरूपाचा असून देवनागरी लिपीत मराठी भाषेत सहा ओळींमध्ये कोरलेला आहे. वातावरणाचा परिणाम झाल्याने काही अक्षरे झिजलेली असून काही ठिकाणी लेख खंडित झाला आहे. मात्र छाप घेतल्यानंतर लेखातील मजकूर प्रयत्नपूर्वक वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन**

**१.।।श्री सक्ती**
**२.विसाजी बीन**
**३.सीधेश्वर ती**
**४.सगाव सके**
**५.१६८७ धोंडा सु**
**६.चै.१।।**

शिलालेखाच्या वाचनावरून सिद्धेश्वर यांचे पुत्र विसाजीराव यांनी श्रीशक्ती अर्थात जगदंबा देवीच्या भक्तिभावातून ही बारव उभारल्याचे दिसून येते. लेखात तिसगाव या गावाचा उल्लेख असून शालिवाहन शके १६८७ अशी कालगणना दिलेली आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या शुभदिनी बारव बांधण्याचे कार्य झाल्याचे लेखातून स्पष्ट होते.

या शिलालेखाची सुरुवात 'श्रीशक्ती' या उल्लेखाने होते. श्रीशक्ती म्हणजे जगदंबा देवीच्या चरणी भक्तिभाव व्यक्त करणारा हा उल्लेख तत्कालीन समाजातील धार्मिक श्रद्धा आणि लोककल्याणकारी कार्य यांच्यातील जवळचा संबंध अधोरेखित करतो.

त्या काळात धार्मिक भावनेतून मंदिर, बारव, विहिरी, तलाव यांसारख्या सार्वजनिक उपयोगाच्या वास्तू उभारणे हे पुण्यकर्म तसेच समाजोपयोगी कार्य मानले जात होते. त्याच परंपरेचा प्रत्यय विसाजीराव यांनी उभारलेल्या या बारवेतून येतो.

शिलालेखात विसाजीराव यांचे नाव नोंदलेले असल्यामुळे या जलवास्तूच्या निर्मितीमागील व्यक्तीची ओळख निश्चित करता येते. तसेच तिसगाव या ग्रामनामाच्या उल्लेखामुळे हा लेख अठराव्या शतकातील स्थानिक सामाजिक व धार्मिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण प्राथमिक पुरावा ठरतो.

अठराव्या शतकात ग्रामीण भागातील लोकजीवनात बारवांना विशेष महत्त्व होते. पिण्याचे पाणी, स्नान, दैनंदिन वापर तसेच धार्मिक व सामाजिक कार्यांसाठी बारवांचा उपयोग केला जात असे. त्यामुळे धामणगाव येथील ही बारव तत्कालीन जलव्यवस्थापन, जलसंस्कृती आणि सार्वजनिक सुविधांच्या निर्मितीची परंपरा अधोरेखित करणारी वास्तू आहे.

बारव बांधण्यासाठी स्थानिक व्यक्तीने केलेला पुढाकार हा त्या काळातील सामाजिक बांधिलकीचेही दर्शन घडवतो. राजे किंवा संस्थानिक यांच्या दानकार्याबरोबरच सामान्य अथवा स्थानिक व्यक्तींनी उभारलेल्या समाजोपयोगी वास्तूंची नोंद अशा शिलालेखांमधून समोर येते.

या बारवेला स्थानिक परंपरेनुसार 'खरूज नायट्याची बारव' असे म्हटले जाते. लोकश्रद्धेनुसार या बारवेच्या पाण्यात अंघोळ केल्यास खरूज, नायटे किंवा काही त्वचारोगांपासून आराम मिळतो, अशी धारणा आहे. त्यामुळे ही बारव केवळ जलस्रोत न राहता स्थानिक लोकविश्वास आणि सांस्कृतिक स्मृतीशी जोडलेली जलवास्तू बनली आहे.

या पाण्याला औषधी अथवा उपचारात्मक गुणधर्म असल्याच्या लोकश्रद्धेचा उल्लेख स्थानिक परंपरेच्या संदर्भात महत्त्वाचा आहे; मात्र त्यासंबंधी वैज्ञानिक निष्कर्ष स्वतंत्र अभ्यासानंतरच निश्चित करता येतील.

शालिवाहन शके १६८७, पार्थिव नाम संवत्सर आणि चैत्र शुद्ध प्रतिपदा यांसारख्या कालगणनेच्या नोंदीमुळे या शिलालेखाला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा हिंदू पंचांगातील वर्षारंभाचा मंगल दिवस मानला जात असल्याने या दिवशी बारव बांधण्याचे कार्य सुरू करण्यामागे धार्मिक आणि शुभत्वाची भावना असण्याची शक्यता दिसून येते.

या शिलालेखातून दाता, त्यांचे पितृनाम, संबंधित गाव, देवतेचे नाव, कालगणना आणि जलवास्तूच्या निर्मितीची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होते. त्यामुळे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी हा अत्यंत उपयुक्त प्राथमिक स्रोत ठरतो.

आज आधुनिक जलसुविधा उपलब्ध असल्या तरी अशा प्राचीन बारवा आणि त्यावरील शिलालेख आपल्या



पूर्वजांच्या जलव्यवस्थापन कौशल्याची, धार्मिक श्रद्धेची आणि समाजोपयोगी दृष्टिकोनाची आठवण करून देतात. काळाच्या ओघात शिलालेखावरील अक्षरे झिजत असल्याने अशा वास्तूंचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि स्थानिक पातळीवर जनजागृती करणे आवश्यक आहे.

धामणगावच्या जगदंबा माता मंदिरासमोरील 'खरूज नायट्याची बारव' आणि तिच्यावरील शिलालेख हा केवळ जुन्या बांधकामाचा अवशेष नसून अठराव्या शतकातील धार्मिक श्रद्धा, जलसंस्कृती, लोककल्याण आणि स्थानिक सामाजिक इतिहास यांचा जिवंत दस्तऐवज आहे. सिद्धेश्वरपुत्र विसाजीराव यांच्या या कार्यातून तत्कालीन समाजातील सार्वजनिक हिताची जाणीव आणि धार्मिक भावनेतून समाजोपयोगी वास्तू उभारण्याची परंपरा स्पष्टपणे दिसून येते.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती व वाचन पुणे येथील शिलालेखतज्ज्ञ अनिल दुधाणे यांनी केले आहे तर त्यांना प्रसाद शिंदे व आशुतोष देशमुख यांची विशेष मदत झाली आहे.

# कोतूळच्या देवी गल्लीत अंडरग्राउंड ड्रेनेजची जाळी धोकादायक

**लोखंडी जाळीला मोठे भगदाड । चार फूट खोल खड्ड्यामुळे अपघाताचा धोका**

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील कोतूळ येथील देवी गल्लीत श्री. भाऊसाहेब हांडे यांच्या घरासमोरील अंडरग्राउंड ड्रेनेजवरील लोखंडी जाळी मोठ्या प्रमाणात तुटून धोकादायक अवस्थेत आली आहे. जाळीला मोठे भगदाड पडल्याने या ठिकाणी गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

देवी गल्लीत रस्त्याचे काँक्रिटीकरण केल्यानंतर रस्त्याच्या मध्यभागातून अंडरग्राउंड गटार टाकण्यात आले. त्यावर बसविण्यात आलेली लोखंडी जाळी निकृष्ट दर्जाची असल्याने गंजून व तुटून खराब झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जाळीला मोठे भगदाड पडले असून, त्याखाली सुमारे चार फूट खोल खड्डा आहे.



या ठिकाणी नागरिकांची सतत ये-जा असते. त्यामुळे पादचारी, लहान मुले, दुचाकीस्वार तसेच वृद्ध व्यक्तींचा तोल जाऊन खड्ड्यात पडण्याचा धोका आहे. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने तातडीने या धोकादायक जाळीची दुरुस्ती करून मजबूत व दर्जेदार लोखंडी जाळी बसवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, वेळेत उपाययोजना न झाल्यास दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# पाऊले चालली विस्तवाच्या वाटेवर; हनुमान टाकळीची रहाडयात्रा उत्साहात

**लालबुंद निखाऱ्यांवरून अनवाणी चालत भाविकांनी केली नवसपूर्ती**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पंढरपूरची पायी वारी, आर्थिक देणगी, विविध धार्मिक पूजाविधी, व्रतवैकल्ये करून नवस फेडण्याच्या प्रथा प्रचलित आहेत. मात्र, पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र हनुमान टाकळी येथे लालबुंद विस्तवाच्या वाटेवरून अनवाणी चालत नवसपूर्ती करण्याची अनोखी परंपरा आहे. मंगळवारी सूर्यास्ताच्या सुमारास आबालवृद्ध भाविकांनी निखाऱ्यांवरून अनवाणी चालत ही परंपरा जपली.

'बजरंगबली की जय', 'समर्थ हनुमान महाराज की जय', 'हर हर महादेव' अशा गगनभेदी जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. नवस नसतानाही राज्याच्या विविध भागांतून आलेल्या महिला–पुरुष भाविकांनी या विस्तवाच्या वाटेवरून चालण्याचा अनुभव घेतला. रहाडयात्रेचे हे वैशिष्ट्य मंगळवारी भाविकांना प्रत्यक्ष अनुभवता आले.

सायंकाळी चार वाजता हरीश्चंद्र महाराज दगडखैर व कृषी अधिकारी संजय चव्हाण यांच्या हस्ते रहाडीची अग्निपूजा करण्यात आली. त्यानंतर सुमारे दोन तासांनी लालबुंद निखारे तयार झाले. मानकरी मारुती लोखंडे



यांनी अग्निकुंडाला श्रीफळ अर्पण करून सर्वप्रथम निखाऱ्यांवरून चालण्यास सुरुवात केली. यावेळी धार्मिक मंत्रोच्चारांनी परिसर दुमदुमून गेला.

याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष रमेशआप्पा महाराज, आमदार मोनिका राजळे, सरपंच मोनाली राजळे, सभापती सुभाष बर्डे, डॉ. वसंत डमाळ, कृषी संशोधक उद्धव शिरसाट, शिवाजी पालवे आदी उपस्थित होते. मंगळवारी रात्री नऊ वाजेपर्यंत रहाड खेळण्याचा जल्लोष सुरू होता.

श्रावण मासाच्या पूर्वसंध्येला आषाढ वद्य पंचमीचा मुहूर्त साधत सुमारे दहा हजार भाविकांनी समर्थ रामदास स्वामींनी स्थापित केलेल्या गोमयीन हनुमान मूर्तीचे दर्शन घेतले, असा अंदाज विश्वस्त मंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. मंदिर जीर्णोद्धारासाठी भाविकांनी देणग्याही दिल्या.

जवखेडे, पाडळी व वृद्धेश्वर कारखाना या मार्गांवरील जोडरस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले होते. यात्रेत शेतीउपयोगी वस्तूंचीही मोठ्या प्रमाणात विक्री झाली.

# कर्मवीर शंकरराव काळे साहेबांनी सहकाराच्या पंढरीत भक्ती सेवेचा वटवृक्ष उभा केला

**ह.भ.प.अनंत महाराज वहाडणे । कर्मवीर काळे कारखाना कार्यस्थळावर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

लोकांची सेवा हीच खरी भक्ती आणि जनकल्याण हाच खरा भक्तीचा मार्ग आहे. काळे परिवाराने जपलेला हा सेवाभावाचा वारसा आमदार आशुतोष काळे यांच्या माध्यमातून पुढेही असाच सुरू राहील. त्यांच्या जनसेवेची ही वाटचाल त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची नांदी ठरेल असे प्रतिपादन ह.भ.प. अनंत महाराज वहाडणे यांनी केले.

श्री.क्षेत्र खेडले झुंगे येथील ब्रम्हलीन परमपूज्य गुरुवर्य तुकारामबाबा व स्व. शंकरराव काळे यांच्या प्रेरणेतून कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे व आ.आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून गौतम बँकेच्या माजी संचालिका सौ.पुष्पाताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व कोसाका सांस्कृतिक, शैक्षणिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे याहीवर्षी कारखाना कार्यस्थळावरील श्री भगवान विष्णू मंदिरात श्री. संत शिरोमणी नामदेव महाराज व श्री. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवा निमित्त शुक्रवार (दि.०७) ते शुक्रवार दि.(१४) या कालावधीत ५१ व्या भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्याची सांगता ह.भ.प.अनंत महाराज वहाडणे महाराज यांच्या काल्याच्या कीर्तन सेवेने हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाली याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, माजी खासदार स्व. कर्मवीर शंकरराव काळे साहेबांनी कोपरगाव तालुक्यात सहकाराची पंढरी फुलवली आणि या पंढरीत भक्ती व सेवेचा वटवृक्ष उभा केला. स्व.सौ.सुशिलामाई यांनी या वटवृक्षाला प्रेम, संस्कार आणि सेवाभावाचे खतपाणी घालून संपूर्ण परिसराला भक्तीचा आणि समाजसेवेचा




मार्ग दाखविला. याच समृद्ध वारशाला पुढे नेत माजी आमदार अशोकराव काळे यांनी परिसराचा तसेच संपूर्ण तालुक्याचा सर्वांगीण व भक्कम विकास साधला. हाच विकासाचा आणि जनसेवेचा वारसा आमदार आशुतोष काळे समर्थपणे पुढे चालवत आहेत. कोरोना संकटाच्या काळात आमदार आशुतोष काळे यांनी जनतेच्या आरोग्याची घेतलेली काळजी, रुग्णांसाठी उपलब्ध करून दिलेल्या विविध सुविधा आणि केलेली निस्वार्थ सेवा ही अत्यंत मोलाची आणि कौतुकास्पद आहे. संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, गरजूंची सेवा करणे आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे, हीच खरी सेवा आणि हीच खरी भक्ती असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील पाच दशकापासून कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांनी कारखाना कार्यस्थळावर सुरु केलेली अखंड पारायणाची धार्मिक परंपरा माजी आमदार अशोकराव काळे व कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे यांनी आजतागायत सुरु ठेवली असून याहीवर्षी हा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

शुक्रवारी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. अनंत महाराज वहाडणे महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने पारायणाची सांगता झाली. महाराजांनी आपल्या रसाळ,अभ्यासपूर्ण आणि भावपूर्ण निरुपणातून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्यावर व ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकला. संत ज्ञानेश्वरांचे विचार हे मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ आहेत असा संदेश त्यांनी कीर्तनातून दिला.

कीर्तनाच्या उत्तररंगात झालेल्या गोपाळकाला आणि टाळ–मृदंगाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्ती रसात न्हाऊन निघाला. यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते ह.भ.प.अनंत महाराज वहाडणे महाराज यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे व कारखाना पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS

## न्यु आर्टस् महाविद्यालयात डॉ. रंगनाथन जयंती उत्साहात

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे भांडार नसून विद्यार्थ्यांच्या ज्ञानविकासासह व्यक्तिमत्त्व घडविणारे महत्त्वाचे केंद्र आहे. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील ज्ञानसंपदेचा अधिकाधिक उपयोग करून शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन न्यु आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात १२ ऑगस्ट रोजी कार्यक्रम झाला. प्राचार्य सागडे यांच्या हस्ते डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या ग्रंथालयशास्त्रातील योगदानाचे स्मरण करण्यात आले. यावेळी वर्षभर ग्रंथालयाचा सर्वाधिक प्रभावी वापर केल्याबद्दल कु. गीता तोडमल हिला 'बेस्ट युझर अवॉर्ड' देण्यात आला. तसेच ग्रंथालयशास्त्र विषयातील नेट परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल चि. आकाश सांगळे याचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ग्रंथपाल प्रा. संगिता निमसे, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, रजिस्ट्रार बबन साबळे, तसेच ग्रंथालय कर्मचारी एस. एस. डांगे, चेतन साळवे, बनसोड, मते व म्हस्के यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वाचन संस्कृतीच्या जडणघडणीत ग्रंथपाल महत्त्वाचा दुवा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी ग्रंथालय आणि वाचक यांच्यातील ग्रंथपाल हा महत्त्वाचा दुवा आहे. ग्रंथपाल वाचकांची आवड व अभिरुची ओळखून त्यांना योग्य पुस्तके उपलब्ध करून देतात. त्यामुळे वाचकांच्या विचारांच्या कक्षा रुंदावून समाजाच्या जडणघडणीत हातभार लागतो, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी केले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने जिल्ह्यातील विविध वाचनालयांतील ग्रंथपालांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, खजिनदार तनवीर खान, सहकार्यवाह राहुल तांबोळी, संचालिका शिल्पा रसाळ, कार्यक्रम संयोजक किरण आगरवाल, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे व सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल उपस्थित होते. शिल्पा रसाळ यांनी जिल्हा वाचनालयाच्या वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. कवी चंद्रकांत पालवे यांनीही वाचकांना त्यांच्या आवडीची ग्रंथसंपदा उपलब्ध करून देण्यात ग्रंथपालांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. यावेळी रेणुका पालवे, प्रा. संगिता निमसे, स्वाती कडनोर, शीला बारावकर, सुवर्ण बोरनारकर, संदीप नन्नवरे, अमोल इथापे, नितीन भारताल, भाग्यश्री पांढरे, पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आर्यन मडुर व ओम केदारे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा रसाळ, सत्काराचे संयोजन किरण आगरवाल यांनी केले, तर राहुल तांबोळी यांनी आभार मानले.

## भागुबाई घुले यांचे निधन

**पाथर्डी । वीरभूमी–**



तालुक्यातील वारकरी संप्रदायातील श्रीमती भागुबाई बाबुराव घुले (वय १०७) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त प्राध्यापक, योग प्रशिक्षक तथा मुंबई हायकोर्टातील वकील अ‍ॅड. महादेव बाबुराव घुले यांच्या त्या मातोश्री होत.

# करंदी गावात बालविवाहमुक्तीचा संकल्प

### स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ग्रामस्थांचा एकमुखी पुढाकार । मुलींचे पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करण्याचा निर्धार

**पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्धी गाव योजनेत द्वितीय क्रमांक पटकावलेल्या करंदी गावात स्नेहालय संचलित 'उडान प्रकल्पा'अंतर्गत 'माझे गाव बालविवाहमुक्त गाव' या संकल्पनेवर आधारित विशेष ग्रामपंचायत बैठकीचे आयोजन करण्यात आले. आगामी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी ग्रामस्थांनी एकमुखी पुढाकार घेतला.

ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत अधिकारी ओल्विन शेक्सपिअर होते. यावेळी स्नेहालय संचलित उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम, सरपंच नंदाताई गव्हाणे, उपसरपंच अर्जुनराव ठाणगे, गणेश चौधरी, युवा नेते भास्कर गव्हाणे, संतोष थोरात, लखन ठाणगे, पांडुरंग पिंपरकर, पाटीलबा ठाणगे, भाऊसाहेब गांगड, भूषण थोरात, अंगणवाडी सेविका सुरेखा गोरे, हमीदा शेख, ज्योती उघडे, मनिषा चौधरी, सीआरपी सुवर्णा एकविरे, विमल चौधरी, मुख्याध्यापक रोकडे सर, गायकवाड




सर, दादाभाऊ ठाणगे, भाऊ गाडेकर, स्नेहालयचे सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत येळवंडे, महेश तुपेरे, पत्रकार भगवान गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रवीण कदम यांनी अभियानाची रूपरेषा मांडली. 'माझे गाव बालविवाहमुक्त गाव' या संकल्पनेअंतर्गत गावातील प्रत्येक विद्यार्थिनीने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्याशिवाय तिचा विवाह केला जाणार नाही, अशी प्रतिज्ञा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बालविवाह रोखण्यासाठी गावात विविध प्रभावी उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

जोखीमग्रस्त मुली, दहावीनंतर शाळा सोडलेल्या मुली तसेच प्रेमप्रकरणातील मुलींचे विशेष समुपदेशन करण्यात येणार आहे. बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी महिन्यातून दोन प्रबोधन कार्यक्रम घेण्यात येणार असून, अंगणवाडी सेविका, सीआरपी सेविका आणि महिला बचत गटांच्या माध्यमातून गावातील प्रत्येक घटकापर्यंत बालविवाह प्रतिबंधाचा संदेश पोहोचविण्यात येणार असल्याचे कदम यांनी स्पष्ट केले. बैठकीचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका सुरेखा गोरे यांनी केले, तर आभार युवा नेते भास्कर गव्हाणे यांनी मानले. करंदी ग्रामस्थांच्या या स्तुत्य उपक्रमाचे तालुक्यातून कौतुक होत आहे.

## अगस्ती विद्यालयात मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी यांना अभिवादन



**पारनेर । वीरभूमी –**

भावपूर्ण वातावरणात

शिक्षण क्षेत्रातील योगदानाला उजाळा; निबंध व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

अकोले : अगस्ती एज्युकेशन सोसायटीच्या मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी व गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब पारधे होते.

प्रास्ताविकातून सतीश नाईकवाडी यांनी मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी यांच्या आठवणींना उजाळा दिला. उपस्थित मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी विद्यार्थी तसेच आजी-माजी शिक्षकांनी आपल्या मनोगतातून दुर्गाबाई नाईकवाडी यांच्या शिक्षणप्रेमी, सेवाभावी व संस्कारक्षम व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. स्मृतिदिनानिमित्त विद्यालयात संस्थांतर्गत निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय पवार यांनी केले, तर आभार सुनीता नाईकवाडी यांनी मानले.

यावेळी शिरीष नाईकवाडी, भानुदास पोखरकर, विठ्ठल गायकवाड, जे. एस. वाकचौरे, संपतराव नाईकवाडी, शिवाजी चौधरी, शिवाजी बिबवे, मंगेश खांबेकर, मुख्याध्यापक संजय शिंदे, तात्यासाहेब दौंड, नंदा गोपाळे तसेच अगस्ती शिक्षण संस्थेचे आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजीवनी अकॅडमीला राष्ट्रीय मॉडेल युनायटेड नेशन्स परीषदेत उपविजेते पद

**कोपरगाव । वीरभूमी –**

ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) येथील मिटी युनिव्हर्सिटीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित 'मॉडेल युनायटेड नेशन्स (एमयुएन) राष्ट्रीय परिषद २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत संजीवनी अकॅडमीच्या १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांनी प्रभावी वक्तृत्व, आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे सखोल आकलन, राजनैतिक कौशल्य आणि विचार मांडणीच्या माध्यमातून संजीवनी अकॅडमीचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले.

मिटी युनिव्हर्सिटीने आयोजित केलेल्या 'मॉडेल युनायटेड नेशन्स' ही दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परीशद नुकतीच पार पडली. देशभरातील नामांकित शाळा व महाविद्यालयांमधील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेतील 'महाभारत' संकल्पनेवर आधारित स्पर्धेत जान्हवी अनुप पटेल, विहान समाधान दहिकर, कार्तिक चंद्रशेखर चांदगुडे, आरोही अमोल कुलकर्णी आणि प्रियांशु प्रवीण हिरे हिने 'संयुक्त



> संजीवनी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील मॉडेल युनायटेड नेशन्स स्पर्धेत केलेली उल्लेखनीय कामगिरी ही संपूर्ण संजीवनी परिवारासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी केवळ प्रभावी वक्तृत्वच केले नाही, तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे सखोल आकलन, चिकित्सक विचार, नेतृत्वगुण आणि राजनैतिक कौशल्य यांचेही उत्कृष्ट प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांना पाठ्यापुस्तकाबाहेरील ज्ञान, जागतिक घडामोडींची जाणीव आणि आत्मविश्वासाने आपले विचार मांडण्याची संधी मिळावी, हा संजीवनी अकॅडमीचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. राष्ट्रीय स्तरावर संजीवनीचे नाव उंचावणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. भविष्यातही त्यांनी मोठी स्वप्ने पाहून देशासाठी सक्षम, जबाबदार आणि संवेदनशील नेतृत्व घडवावे, हीच अपेक्षा आहे.
>
> – **डॉ. मनाली कोल्हे,** संचालिका, संजीवनी अकॅडमी

राष्ट्र महिला स्थिती आयोग' (युएनसीएसडब्ल्यु) आधारित संकल्पनेवर प्रभावी विचार मांडल्याने विशेष प्रावीण्याने गौरविण्यात आले.

तसेच 'महाभारत' संकल्पनेवर आधारित स्पर्धेत वीरा योगेश कोठारी, पलक विनायक बोधक, देवाशिष रावसाहेब शेंडगे , ओवी विकास आघाव, अथर्व अश्विनकुमार टिळेकर आणि श्रीहर्ष किसन थेटे यांनी सहभाग नोंदविला. युएनसीएसडब्ल्यु संकल्पनेवर आधारित स्पर्धेत राजवी रश्मी शर्मा, शर्विल योगेश खैरनार, सुरभी संतोषकुमार कोकणे, सई धनंजय कुंभार, गार्गी योगेश शूल, श्रेयसी निलेश गायकवाड आणि संविदा अमोल जोशी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. संजीवनी अकॅडमीच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत त्यातूनच संजीवनीचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करीत आहेत.

या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष श्री. नितीनदादा कोल्हे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट श्री. अमित कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक केले. यावेळी डॉ. आर. एस. शेंगडे, डॉ. सुधांशु भट, सुधा सुब्रमण्यम, अनुश्रीता सिंग, आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील कामगिरीबद्दल संजीवनी अकॅडमीच्या शिक्षक, पालक आणि विद्यार्थीवर्गातून अभिनंदन होत आहे.

## काकडी येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील ३० गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

### लायन्स क्लब ऑफ राहाता सह्याद्रीचा स्तुत्य उपक्रम




**राहाता । वीरभूमी –**

काकडी येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील आर्थिकदृष्ट्या गरजू ३० विद्यार्थ्यांना लायन्स क्लब ऑफ राहाता सह्याद्रीच्या वतीने शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने क्लबने हा उपक्रम राबविल्याचे क्लबचे प्रेसिडेंट ला. सागर रोकडे यांनी सांगितले. 'सेवा हीच खरी समाजसेवा' या भावनेतून क्लबच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, त्याचाच एक भाग म्हणून गणवेश वाटप करण्यात आल्याचे ला. राजेंद्र फंड यांनी सांगितले.

क्लबचे संस्थापक ला. विनोद गाडेकर म्हणाले, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. विद्यालयातील शिक्षकांनी काही गरजू विद्यार्थ्यांना बुटांची गरज असल्याचे सांगितले आहे. क्लबचे सदस्य ला. गणेश कुऱ्हाडे यांच्या वतीने विद्यार्थ्यांची ही मागणी पूर्ण करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी भविष्यातही आवश्यक ते सहकार्य केले जाईल.

क्लबचे सेक्रेटरी ला. अमोल उगले यांनी 'आजचा विद्यार्थी कसा असावा' यावर मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या वतीने लायन्स क्लबच्या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांना वेळेवर मिळणारी मदत त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देऊन शिक्षणाची गोडी निर्माण करण्यास हातभार लावते, असे कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन संस्थेचे इन्स्पेक्टर प्रा. नारायण वारे यांनी सांगितले.

यावेळी लायन्स क्लबचे ट्रेझरर ला. सुनील धाडगे, ला. दादा चौधरी, ला. सिराज शेख, ला. गणेश कुऱ्हाडे, ला. दयानंद डोके तसेच न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक बी. जी. गुडघे, एस. बी. पोकळे, जे. वाय. पानसरे, ए. पी. गेम, एस. आय. शेख, पी. डी. दिघे, आर. एम. सोनवणे, आर. सी. माळी, पी. पी. देशमुख, एम. आर. जेडगुले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

लायन्स क्लबच्या या उपक्रमामुळे काकडी परिसरात सामाजिक बांधिलकीचे आदर्श उदाहरण निर्माण झाले असून, गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी भाजपची मोर्चेबांधणी

### प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या बैठकांचा झंझावात

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी विदर्भाचा दोन दिवसीय झंझावाती दौरा करत संघटनात्मक बैठकांच्या माध्यमातून निवडणुकीच्या तयारीला वेग दिला. त्यांच्या या दौऱ्यानंतर आता भाजपची संघटनात्मक यंत्रणा नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरली आहे.

या दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नागपूर ग्रामीण (रामटेक), चंद्रपूर महानगर व ग्रामीण, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर महानगर, काटोल आणि वर्धा या संघटनात्मक जिल्ह्यांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये संघटनात्मक बांधणी, निवडणूक नियोजन आणि कार्यपद्धतीचा आढावा घेत चव्हाण यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटित आणि नियोजनबद्ध पद्धतीने निवडणूक लढवण्याचे मार्गदर्शन केले. चंद्रपूरमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान ब्रह्मपुरी येथील, १९८० पासून पक्षकार्यासाठी समर्पित असणाऱ्या प्रा. शेख सर यांचा चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. शेख सर यांच्यासारखे देवदुर्लभ कार्यकर्ते हे भाजपा परिवाराचे खरे आधारस्तंभ आहेत. अशा निष्ठावंत ज्येष्ठांच्या संघर्षातूनच आज पक्षाचा हा भव्य वटवृक्ष साकार झाला आहे. असे यावेळी रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

या दौऱ्यादरम्यान रामटेकचे जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, आ. कीर्तिकुमार (बंटी) भांगडीया, माजी आ. अतुल देशकर, ज्येष्ठ नेते किसन नागदेवे, माजी आ. कृष्णा गजभिये आणि आ. विनोद अग्रवाल यांच्या निवासस्थानी/कार्यालयाला सदिच्छा भेटी देत रविंद्र चव्हाण यांनी स्थानिक कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला.

या दौऱ्यात मंत्री डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री तथा पालकमंत्री पंकज भोयर, प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे, आ. संजय भेंडे, आ. प्रवीण दटके, आ.




कीर्तिकुमार (बंटी) भांगडीया, आ. किशोर जोरगेवार, आ. करण देवतळे, आ. देवराव भोंगळे, आ. चैनसुख संचेती, आ. अरुण लखाणी, आ. परिणय फुके, आ. विनोद अग्रवाल, आ. विजय रहांगडाले, आ. संजय पुराम, आ. अविनाश ब्राह्मणकर यांच्यासह माजी खासदार हंसराज अहिर, सुनील मेंढे, माजी आमदार व पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

सलग संघटनात्मक बैठका, वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधल्यामुळे नागपूर पदवीधर मतदारसंघातील भाजपच्या निवडणूक तयारीला नवी गती मिळाली. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या दौऱ्याने विदर्भातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पक्षकार्यासाठी स्पष्ट दिशा व प्रेरणा मिळाली असून संघटनेत नवा उत्साह, ऊर्जा आणि विजयाचा निर्धार संचारला आहे.

> आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात विदर्भात विकासाची गंगा प्रवाहित झाली आहे. नागपूर ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पुण्यभूमी असून विदर्भ हा भाजपचा भक्कम बालेकिल्ला आहे. या दौऱ्यात कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि विजयाचा आत्मविश्वास दिसला. नागपूर पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीसाठी आम्ही सर्व ताकदीनिशी सज्ज आहोत. आमचाच विजय होईल, याचा पूर्ण विश्वास आहे.
>
> – **रविंद्र चव्हाण,** प्रदेशाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र प्रदेश

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# रेनवडी ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चा, महत्त्वपूर्ण निर्णय

## ‘आमचा गाव, आमचा विकास’ आराखड्यास मंजुरी । आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण व पर्यावरणावर भर

**● पारनेर । वीरभूमी–**

ग्रामपंचायत रेनवडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांच्या वतीने शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता ग्रामपंचायत कार्यालयासमोरील प्रांगणात सर्वसाधारण ग्रामसभा प्रशासक श्रीकांत डेरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ग्रामस्थांनी विविध विषयांवर साधक-बाधक चर्चा करून गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

ग्रामसभेत १६ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत ‘आमचा गाव, आमचा विकास’ (GPDP)–२०२६ विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची अंमलबजावणी व तपासणी, प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण अंतर्गत आवास प्लस २०२४ सर्वेक्षणातील कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी अंतिम करणे, तसेच ग्रामपंचायतीच्या घरपट्टी, पाणीपट्टी व इतर करांच्या मागणी–वसुलीचा आढावा घेण्यात आला.

गावातील पात्र मात्र अद्याप स्वयंसहायता समूहात सहभागी न झालेल्या महिलांना संघटित करून नवीन समूह स्थापन करण्याबाबत तसेच आपले सरकार सेवा केंद्रामार्फत नागरिकांना मिळणाऱ्या विविध सेवांबाबत चर्चा करण्यात आली.

‘माझे गाव आरोग्य संपन्न गाव’ व टीबीमुक्त पंचायत अभियान, घनकचरा व्यवस्थापन नियम–२०२६ची अंमलबजावणी, बालविवाहमुक्त ग्रामपंचायतीसाठी उपाययोजना आणि वृक्षलागवड कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. लागवड केलेल्या वृक्षांचे संरक्षण व नियमित पाणीपुरवठ्यावर विशेष भर देण्याचे ठरले.

शिक्षण विषयावर चर्चा करताना शाळेतील पटनोंदणी, विद्यार्थ्यांची उपस्थिती, मूलभूत सुविधा, कौशल्य विकास व शाळा व्यवस्थापनाबाबत आवश्यक उपाययोजनांवर विचारविनिमय झाला.

नशामुक्त भारत अभियानाच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त नशामुक्तीबाबत जनजागृती, ‘विकसित भारत रोजगार व उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) कायदा–२०२५’ (विकसित भारत जी. राम.जी) तसेच ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम–२०२६’ याबाबत व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय आदिशक्ती अभियान, ग्राम बाल संरक्षण समितीची स्थापना, बेटी बचाओ–बेटी पढाओ अभियान, भू–आधार (ULPIN) बाबत नागरिकांमध्ये जागृती व सहभाग तसेच जमीन व जलसंसाधनाच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी गावाच्या वचनबद्धतेच्या ठरावास मंजुरी देण्याबाबत चर्चा झाली.

‘मेरा गाव मेरी धरोहर’ उपक्रमांतर्गत गट पोर्टलवर करण्यात आलेल्या नोंदींचा आढावा घेण्यात आला. महिला, दिव्यांग, अनुसूचित जाती–जमातींसह असुरक्षित घटकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामसभेतील त्यांचा सहभाग वाढविण्याबाबतही चर्चा झाली.

ग्रामसभेतील उपस्थिती व विविध निर्णयांचे चित्रीकरण करून केंद्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या ‘पंचायत निर्णय’ प तसेच ‘आवास प्लस’ पवर आवश्यकतेनुसार अपलोड करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

ग्रामसभेस गावातील १८ वर्षांवरील बहुसंख्य नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. गावाच्या एकूण मतदारसंख्येच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक नागरिकांची उपस्थिती ग्रामसभेस लाभली.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी हरिश्चंद्र काळे यांनी विविध शासकीय योजना, अभियान व विषयांच्या प्रभावी




अंमलबजावणीबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. ग्रामसभेस मुख्याध्यापक मच्छिंद्र पावडे, ग्राम महसूल अधिकारी रवींद्र शिरसाट, तालुका उमेद अभियान कक्षाचे किरण चव्हाण, समुदाय आरोग्य अधिकारी रेश्मा वाळुंज, आरोग्यसेवक अनिल पिसे, अंगणवाडी सेविका, प्राथमिक शिक्षक, बचत गट प्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामसभेतील चर्चेत भिवसेन येवले, मुकेश डेरे, बाबासाहेब येवले, मोतीराम येवले, राजाराम येवले, कांचन येवले, राजेश डेरे व बाबाजी येवले यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. बाजीराव भोर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

गावाच्या विकासासाठी विविध विषयांवर सकारात्मक व विधायक चर्चा होऊन भविष्यातील विकासाची दिशा निश्चित करण्यात आली. ग्रामसभा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नागपंचमीनिमित्त रंगली मेहंदी



**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रावण म्हणजे सण, उत्सव, मांगल्याचा पवित्र महिना. महिला आणि मुलींसाठी नागपंचमी हा सण विशेष आनंदाने साजरा केला जातो. श्रद्धा, आनंद, पारंपरिक खेळ खेळण्याचा सुंदर सण म्हणजे नागपंचमी. त्यात मेहंदी चा खुललेला रंग. असाच मेहंदीचा रंग खुलला रयतच्या न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव विद्यालयातील मुलींच्या हातावर.

नागपंचमी सणाचे औचित्य साधून खास मुलींसाठी शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत ५ वी ते १० अखेरच्या ५५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवत, एकापेक्षा एक सरस मेहंदी काढली. प्रियल कुसाळकर, प्रांजल मांडे, अनन्या जगताप, आदिती नागवडे, आराध्या ढवण, श्रेया जगताप, मिसबा शेख, श्रावणी लाळगे, गौरी राऊत, ईश्वरी चव्हाण स्पर्धेत बाजी मारली.

मुख्याध्यापक हौसराव दांगडे, पर्यवेक्षक विलास सुलाखे यांच्या मार्गदर्शनानुसार मीनाक्षी कदम, सुजाता डाके, मनीषा व्यवहारे, लक्ष्मी बोलणे, सारिका साळवे, किरण लाळगे या महिला शिक्षिकांनी ही स्पर्धा यशस्वी केली. हातावरील मेहंदीचा रंग पाहून विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावरील रंगही खुलून आला.

# गुन्हेगारी देशाला लागलेली सर्वात मोठी कीड

## स.पो.नि. विलास जाधव । चापडगाव विद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त द्विदिनी कार्यक्रम

**● शेवगाव । वीरभूमी–**

दैनंदिन जीवन जगताना आजचा तरुण व्यसनाकडे वळत असल्याने गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. गुन्हेगारी ही देशाला लागलेली सर्वात मोठी कीड आहे, असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास जाधव यांनी केले.



शेवगाव तालुक्यातील चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित त्रिदिनी कार्यक्रमांतर्गत द्विदिनी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी स.पो.नि. विलास जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना चुकीच्या लोकांच्या संपर्कात न राहण्याचा तसेच शिक्षक व आई–वडिलांच्या सूचनांचे पालन करण्याचा सल्ला दिला.

जीवनात चांगला मार्ग निवडा, स्वतःच्या पायावर उभे रहा. अंधाराकडून प्रकाशाकडे, तिमिराकडून तेजाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारा. देशाची धुरा भविष्यात तरुणांच्या खांद्यावर असणार आहे, असे त्यांनी सांगितले.

दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये वाढ होत असून, त्यामागे प्रसारमाध्यमांचा प्रभाव हेही एक कारण असल्याचे जाधव यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी प्रसारमाध्यमांचा अतिरेक टाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे त्यांनी गुन्ह्यांची उदाहरणे देत निरसन केले.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, पोलीस कॉन्स्टेबल विजय सुपेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्य कार्यक्रमाचे ध्वजारोहण चापडगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. विठाबाई पातकळ यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा

## निवेदने, साखळी उपोषणानंतरही प्रश्न कायम असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

**● अकोले । वीरभूमी –**

उच्चदाब वीजवाहिनीचे पोल धोकादायक पद्धतीने उभारण्यात आल्याचा आरोप करत नवलेवाडी व माळीझाप येथील शेतकऱ्यांनी महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. संबंधित पोल तत्काळ हटवावेत तसेच या प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी पद्माकर वाळूंज, सुधीर झोळेकर यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

याबाबत शेतकऱ्यांनी सांगितले की, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस प्रशासनाच्या विरोधात औरंगपूर, नवलेवाडी व माळीझाप येथील नागरिकांनी २२ जानेवारी २०२६ रोजी उपोषण सुरू केले होते. दुसऱ्या दिवशी महावितरणचे अकोले उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता शेळके व संगमनेर येथील वरिष्ठ अभियंता कुमावत यांनी उपोषणस्थळी येऊन चर्चा केली होती.

उपोषण सोडण्यासाठी महावितरणने दिलेल्या पत्रात नवीन वीजवाहिनीला शेतकऱ्यांचा विरोध असल्याने दोन्ही गटांतील वाद मिटेपर्यंत काम ‘सध्याच्या स्थितीत’ ठेवण्यात येईल, असे नमूद करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर संबंधित वीजवाहिनीचे काम पूर्ण करण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यामुळे भविष्यात जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

महावितरणच्या प्लॅन व इस्टिमेटनुसार वीजवाहिनी रस्त्याच्या वरच्या बाजूने जाणे अपेक्षित असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दहिफळे व पाचोडकर यांनी प्रत्यक्ष पोलची पाहणी केली असून, काही पोल डांबरी रस्त्यापासून अवघ्या दोन ते चार फूट अंतरावर असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. हे पोल धोकादायक असल्याने ते हटविण्याबाबत संबंधित पेट्रोल पंप चालक व महावितरण कार्यालयाला पत्र देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

तरीही ८ जून २०२६ रोजी उर्वरित पोल उभारून वीजवाहिनी जोडण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. यावेळी रस्त्यालगतची काही झाडे तोडण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रकरणी वेळोवेळी निवेदने देऊन, साखळी उपोषण करून तसेच तोंडी विनंत्या करूनही प्रश्न सुटला नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. त्यामुळे धोकादायक पोल तातडीने हटवावेत, वीजवाहिनीबाबत फेरतपासणी करावी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागण्यांसाठी लवकरच आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# कोकमठाण येथील आत्मा मालिक प्राथमिक गुरूकुलचे पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र



**● कोपरगाव । वीरभूमी –**

आत्मा मालिक प्राथमिक गुरूकुल, कोकमठाणच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित केलेल्या या शिष्यवृत्ती परीक्षेत येथील एकूण ०५ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहे. त्यामध्ये २७० गुण मिळवून जिल्हयात सातवा व तालुक्यात प्रथम येण्याचा मान कड तन्मय शरद या विद्यार्थ्याने पटकविला आहे. तसेच शिंदे विहान भाऊसाहेब– २५६ गुण, गजमल विक्रांत गणेश– २४४ गुण, कुटे ईश्वर अनिल – २४२ गुण व चव्हाण हेमंत तानाजी– २३६ गुण मिळविले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गुणगौरव करण्यात आला.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य संदीप गायकवाड, विभाग प्रमुख कोंडाजी पवार, वर्गशिक्षिका सानप मॅडम व विषय शिक्षिका रड्डी मॅडम आदिंचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, मीरा पटेल आदिंनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# १ जानेवारीपासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याची शिक्षक परिषदेची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केल्यानंतर महाराष्ट्रातील राज्य शासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही त्याच धर्तीवर वाढीव महागाई भत्ता लागू करण्याचे शासन आदेश तातडीने निर्गमित करावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे स्मरणपत्र महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच संबंधित विभागांना दिले आहे. केंद्र शासनाच्या निर्णयानुसार राज्यातील कर्मचारी व शिक्षकांना देखील १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता मिळणे अपेक्षित असल्याचे शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले.

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यात २ टक्के वाढ लागू केली आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये महागाई भत्त्याला विशेष महत्त्व आहे. दैनंदिन जीवनावश्यक वस्तू, शिक्षण, आरोग्य, घरभाडे, प्रवास आणि इतर खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असल्याने कर्मचाऱ्यांना मिळणारा महागाई भत्ता हा त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने एकमताने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक असल्याचे शिक्षक परिषदेने म्हटले आहे. केंद्र शासनाने वाढीव महागाई भत्ता लागू करून केंद्रीय कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे. त्याचप्रमाणे राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना वाढीव महागाई भत्त्याचा लाभ देणे आवश्यक आहे. राज्य शासनाने याबाबत कोणताही विलंब न करता तातडीने शासन आदेश काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प. प्राथमिक शाळा पाथर्डी मुलींचे घवघवीत यश

**● पाथर्डी । वीरभूमी –**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी मुलीच्या विद्यार्थिनींनी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेसह महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत शाळेच्या कु. रुची भाताडे हिने २६० गुण मिळवून उल्लेखनीय स्थान प्राप्त केले. तसेच कु. स्वरा गुंजाळ हिने २४८ गुण, कु. आराध्या फुटाणे हिने २४८ गुण, तर कु. आनंदी खरमाटे हिने २२८ गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन केले.



याशिवाय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेच्या तब्बल १२ विद्यार्थिनी पात्र ठरल्या आहेत. त्यामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे. विद्यार्थिनींनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांच्या जोरावर हे यश मिळविले आहे.

तसेच इयत्ता पहिली व दुसरी मंथन प्रज्ञाशोध परीक्षेतही शाळेच्या सात विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळवत आपली गुणवत्तेची छाप उमटवली आहे. लहान वयातच विद्यार्थिनींमध्ये स्पर्धात्मक परीक्षांची गोडी निर्माण करण्याच्या शाळेच्या प्रयत्नांना या यशामुळे मोठे बळ मिळाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थिनींचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करण्यात येत आहे. विद्यार्थिनींच्या गुणवत्तेला योग्य दिशा देण्यासाठी शाळेतील शिक्षकवृंद सातत्याने प्रयत्नशील असून, भविष्यातही विविध स्पर्धा व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये विद्यार्थिनींनी उत्तुंग यश संपादन करावे, यासाठी शाळेच्या वतीने विशेष मार्गदर्शन केले जात आहे.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सचिन राख, शिवाजी कराड, रामनाथ कराड, केंद्रप्रमुख श्रीमती सविता कुटे, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, मुख्याध्यापक राजू गोल्हार, श्रीमती शीला नागरे, सुरेश जायभाय, श्रीमती मंगल कीर्तने, श्रीमती अनुराधा तरवडे, श्रीमती लता भंडारे, आणि श्रीमती अर्चना खाडे, माजी मुख्याध्यापिका रत्नप्रभा महांडुळे यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांचे पालक यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# बंद पेट्रोलपंपावर चोरट्यांचा डल्ला; ८० हजारांचे साहित्य लंपास

**पाथर्डी तालुक्यातील भुतेटाकळी शिवारातील घटना**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील भुतेटाकळी शिवारात गेल्या दोन महिन्यांपासून बंद असलेल्या पेट्रोलपंपाला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. पेट्रोलपंपावरील विविध विद्युत साहित्य, बॅटऱ्या, यूपीएस, सीसीटीव्हीचे साहित्य तसेच जनरेटरचे साहित्य असा सुमारे ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पेट्रोलपंप मालकांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत सिमा राहुल फुंदे (वय ३३, रा. भुतेटाकळी, ता. पाथर्डी) यांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांचा पाथर्डी ते खरवंडी जाणाऱ्या रस्त्यावर भुतेटाकळी शिवारात पिंपळगव्हाण फाट्याजवळ पेट्रोलपंप आहे. संबंधित पेट्रोलपंप मागील सुमारे दोन महिन्यांपासून बंद होता. दि. १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजता पेट्रोलपंपाची पाहणी करून घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी, दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास त्या पुन्हा पेट्रोलपंपावर गेल्या. त्यावेळी पेट्रोलपंपाचे इलेक्ट्रिक रूमचे गेट कापलेले दिसून आले. त्यामुळे संशय आल्याने त्यांनी इलेक्ट्रिक रूमची पाहणी केली असता तेथील विविध विद्युत उपकरणे व साहित्य गायब असल्याचे निदर्शनास आले. तसेच कार्यालयाच्या रूममध्ये ठेवलेले यूपीएस व बॅटऱ्यांचा संच, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे राऊटर व एलईडी स्क्रीनही आढळून आले नाहीत. पेट्रोलपंपाच्या मागील बाजूस पाहणी केली असता तेथे ठेवलेले जनरेटरही गायब असल्याचे दिसून आले. परिसरात शोध घेतल्यानंतरही चोरीस गेलेले साहित्य मिळून आले नाही. फिर्यादीनुसार, चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे १० हजार रुपये किमतीचे स्टॅबिलायझर, १५ हजार रुपये किमतीच्या दोन बॅटऱ्या, ५० हजार रुपये किमतीचे यूपीएस व बॅटऱ्यांचा संच, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे राऊटर व एलईडी स्क्रीन तसेच पाच हजार रुपये किमतीचे एअर कॉम्प्रेसरचे ३ एचपी मोटार जनरेटर यांचा समावेश आहे. या सर्व साहित्याची एकूण किंमत सुमारे ८० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.